**3.3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five years (10)**

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book/chapters published | Title of the paper | Title of the proceedings of the conference | National / International | Year of publication | ISBN/ISSN number of the proceeding | Whether at the time of publication Affiliating Institution Was same Yes/NO | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **2019-20** | | | | | | | | | |
| | Prof. Navnath B. Bade | Mahatma fule charatil shetkari prashn : karne v upay | | Mahatma Phule Chintan aani charcha | | 18 Fe. 2019 (2018-19) | ISBN - 978-9381948-76-7 | | |

College Code 225
Smt. P.D. Patil Social Work College ✡Khadki, AKOLA✡

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

३१. महात्मा फुले का मानवतावादी दृष्टिकोन ११०
प्रा.डॉ. एस.आर. सांगोळे

३२. **Education as a basic Human Right for woman : - A Phule thinking** 113
Rupasi Das

३३. महात्मा जोतीबा फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म ११६
प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे

३४. महात्मा फुलेजी का सार्वजनिक सत्यधर्म ११९
डॉ. यादव नामदेव मोरे

३५. महात्मा फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म १२२
प्रेरणा दिलीप दीक्षित

३६. महात्मा जोतीराव फुलेंच्या विचारातील शेतकरी १२६
डॉ. राजेंद्र साहेबराव धाये

३७. महात्मा फुले आणि त्यांचा कृषिविषयक दृष्टिकोन १३४
डॉ. डी. बी. खरात

३८. महात्मा फुले यांचे शिक्षण विषय विचार आणि कार्य १३७
प्रा.डॉ. यशवंत पुंडलिकराव गाढे

३९. शेती, शेतकरी आणि शेजमजुरांचे प्रश्न व महात्मा जोतीबा फुले १४१
प्रा. डॉ. दिनकर उंबरकर - प्रा. डॉ. महेंद्र भगत .

४०. महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ १४४
प्रा. प्रदीप पंजाबराव ठाकरे - प्रा. नारायणराव गांवडे

४१. महात्मा फुलेच्या विचारातील शेतकरी प्रश्न : कारणे व उपाय १४७
डॉ. विश्वनाथ कोक्कर

४२. महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार १५१
प्रा. श्रीमंत तुकाराम कावळे - फड महादेवी वैजेनाथ.

४३. महात्मा फुलेंच्या विचारातील शेतकरी प्रश्न : कारणे व उपाय १५६
प्रा. नवनाथ बंकट बडे

४४. महात्मा जोतीबा फुले यांच्या शेतीविषयक विचारांचा अभ्यास १६०
डॉ. महेश प्रभाकरराव देशमुख

४५. महात्मा फुलेचे शेतकरी विषयक विचार काळाची गरज : एक अभ्यास १६३
दलित सुभाष कांबळे

४६. महात्मा फुले यांचे कृषी सुधारणा नीतिविषयक विचार १६७
वाघमारे विनोद राम - आर. व्ही. मस्के.


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

४३

# महात्मा फुलेंच्या विचारातील शेतकरी प्रश्न : कारणे व उपाय

प्रा. नवनाथ बंकट बडे
(सहा. प्राध्यापक)
श्रीमती पी. डी. पाटील, समाजकार्य महाविद्यालय,
खडकी बु. अकोला

१९ व्या शतकातील बोलक्या सुधारकांच्या शाब्दिक गदारोळात उक्तीप्रमाणे कृती करणारे, पहाडा एवढे उंच दिसणारे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा जोतीराव फुले हे होय. महात्मा फुले यांच्या साहित्याने अनेकांना प्रेरणा दिलेली आहे. महात्मा फुले सुधारणांचे अग्रणी होते. त्यांच्या मृत्यूला १२० वर्ष पूर्ण झाली त्यांच्या काळात त्यांनी शेतकरी वर्गासंबंधी जे विचार मांडले ते आज सुध्दा तेवढेच महत्त्वाचे वाटत आहेत. कारण महात्मा फुले दुरदृष्टी असलेले विचारवंत होते. अनेक बाबतीत ते काळाच्या फार पुढे होते. शेती संदर्भात मांडलेले प्रश्न आज जास्त तीव्र स्वरुपात उभे राहिले आहेत. श्रम करणाऱ्या शेतकऱ्यास त्यांच्या श्रमास मोबदला देण्याचा आणि लोकांची धर्म आणि संस्कृती यांच्यामुळे निर्माण झालेली गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रश्न आजही महत्वाचा आहे. हे प्रश्न आजही कायम असल्यामुळे ते जिकिरीचे होत असल्यामुळे आपणास पुन्हा-पुन्हा फुलेंच्या विचाराकडे जावे लागते. त्यांच्या विचारांच्या सानिध्यात जाऊन प्रश्न समजावून घ्यावे लागतात. फुलेंच्या काळात महाराष्ट्रात शेतकरी सरंजामशाही, सावकारशाही आणि साम्राज्यशाही त्यांनी नाडलेला होता. त्या काळात इंग्रज साम्राज्यवाद्यांनी शेतकऱ्यांची पूर्ण नागवणूक केली होती.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड ब्राम्हणांचे कसब या पुस्तकातून अनेक प्रश्नांना वाचा फोडली. शेतकऱ्यांच्या सर्वांगिण मुक्तीचा विचार, सावकरांकडून होणारे शोषण, शेतसारा, धर्माच्या नावाखाली होणारे आर्थिक शोषण, नोकरशाही वर्गाकडून होणारा अन्याय, अशा अनेक प्रश्नावर फुले यांनी वरील दोन पुस्तकांच्या सहाय्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मार्मीकपणे चर्चा केली आहे.

**शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची करणे :**

शेतकऱ्यांचे आयुष्य दीनवाणी करण्यामागे त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक, सावकारशाही, नोकरशाही आणि साम्राज्यशाही इत्यादी घटक शोषण करण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार होत. फुले यांच्या मते या कारणांव्यतिरिक्त त्यांच्या दुरवस्थेची इतर ही काही कारणे होती. या ग्रंथामध्ये फुल्यांनी त्या कारणांची मीमांसा अतिशय प्रभावीपणे केली आहे. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे एक महत्वाचे कारण म्हणजे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्या लोकसंख्येला इतर कामे नसल्यामुळे त्यांचा बोजा शेतकऱ्यांवर पुडला. लोकसंख्या वाढल्यामुळे शेतीचे अनेक तुकडे पडले. अशा लहान शेतकऱ्यांजवळ बैलजोडी सांभाळण्याची ऐपत राहत नसे. ते आपली शेती शेजाऱ्यांपाजाऱ्यास बटाईने किंवा खंडाने देवून आपली मुले-बाळे घेवून मोठ्या शहरात मोलमजुरी करून पोट भरण्यासाठी जात असे. त्यांची अवस्था फार वाईट होती.

शेतकऱ्यांच्या हलाकीचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे १८१८ पासून १८५६-५७ पर्यंत इंग्रजांनी अनेक संस्थाने जिंकून घेतली. खालसा केली, या जिंकलेल्या व खालसा केलेल्या राजेरजवाडे व नवाब यांच्याकडे लाखोंच्या संख्येत लोक नोकरीला होते. त्यांच्या लष्करात, खाजगी दप्तरखान्यात अनेक दलित शेतकऱ्यास काम मिळत असे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतसारा भरणे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविणे कठीण जात नसे. फुलेंच्या मत सदरचे बादशहा राजेरजवाडे लयास गेल्यामुळे सुमारे



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

२५ लाखाच्या वर दलित, कनिष्ठ, मध्यम शेतकरी वर्ग बेकार झाल्यामुळे त्या सर्वांचा बोजा शेती व्यवसायावर पडला आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतावर मोलमजुरी करून उदरनिर्वाह करावा तर मजूर लावण्याइतकी आर्थिक परिस्थिती असलेला मोठा शेतकरी आता राहिलेला नाही. शेतीचे सत्व कमी झाले आहे. शेतीला आता पूर्वी सारखा विसावा मिळत नाही. पशुपक्ष्यांचे खत मिळत नाही. जिराईत शेतीत पिके येवू शकत नाही. बागायती जमिनीतील फुले कमी आल्यामुळे हल्ली बागायती पूर्वीसारखा पिकत नाहीत. गायराने इंग्रज सरकारने ताब्यात घेतली. त्यामुळे जनावरांना पोटभर चारा मिळत नाही. त्यामुळे जनावरे कमी होत आहेत. व जी राहिली आहे ती धकली आहेत. मजबूत बैलांचे येणे कमी झाले आहेत. त्यामुळे बागायत आणि जिरायत जमिनीची पहिल्यासारखी मशागत होत नाही. शेतकऱ्यांची हिंमत कमत आहे. ते रोगराईस बळी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून शेतीची मशागत पाहिजे तशी होत नाही. खतांचा नासाडा होत आहे. फुले लिहितात, मुंबईसारख्या बकाली म्युनिसिपालिटीतील गोऱ्या इंजिनिअर व डॉक्टर कामगारांच्या गैर माहितीमुळे अथवा त्यांच्या आडदांडपणाच्या शैलीमुळे लक्षावधी खंडी खतांचे सत्व वाया जात आहेत. या सर्व गोष्टीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होत आहे. त्यातच शेतकऱ्यांच्या जवळच्या बंदुका आणि बरच्या हिसकावून घेतल्यामुळे त्यांच्या पिकांची रात्री रान डुकरांपासून होणारी नासाडी थांबविण्यासाठी शेतकऱ्यांकडे कोणते ही हत्यार राहिले नाही. त्यामुळे पिकांची नासाडी होत आहे. बाकी शिल्लक राहिलेल्या पिकांवर ब्राम्हण, मारवाडी, लिंगायत सावकार, गुजराती आडते आणि इतर जातीतील दलाल, दीडीवाले नजर ठेवून त्यास ओरबाडून खातात. अशा प्रकारे फुले यांच्या मते शेतकरी फार मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला आहे.

**शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण :**

'शेतकऱ्यांचा आसुड' आणि 'ब्राम्हणांचे कसब' या दोन्ही पुस्तकात फुले यांनी शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण कशा प्रकारे केले जात होते. याचे मार्मिक विवेचन केले आहे. मुळात शेतकरी हा धार्मिक वृत्तीचा आहे. त्याच्या धार्मिक वृत्तीत अंधश्रध्दा दडलेली आहे. या अंधश्रध्देचा व देवभोळेपणाचा उपयोग करून ब्राम्हणांनी त्यांच्यामागे वेगवेगळ्या व्रतांचे व विधींचे शुक्लकाष्ठ लावून दिले आहे. या सर्व व्रतांचा आणि विधींचा मुख्य उद्देश म्हणजे गरीब शूद्रांकडून दक्षिणा लुबाडून घेणे हा आहे. रोख दक्षिणा, धान्य, सुपारी, बदाम, खारिक, कपडे इत्यादी अशा अनेक बाबी शूद्र शेतकऱ्यांकडून धर्मांच्या नावाने ब्राम्हण (विचार प्रवृत्ती) लुबाडतात. ब्राम्हण खास विधी करुन व सणांच्या मुहूंतावर शेतकऱ्यास सातत्याने लुबाडतात.

**सांस्कृतिक शोषण :**

धार्मिक शोषणापासूनच शेतकऱ्यांचे सांस्कृतिक शोषण होते. कारण त्यांचे धार्मिक शोषण त्यांच्या अज्ञानामुळे होते. म्हणून त्यांनी आत्मस्थिती ओळखावी, आपले अधिकार ओळखावे. कारण मानवी अधिकार सर्वांना निसर्गत:च मिळालेले आहे. त्यांचा उपयोग घ्यावा. शूद्रांच्या गुलामगिरीचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अज्ञान होय. विद्याबंदीमुळे शूद्र अज्ञानी राहिले. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथांच्या प्रस्तावनेत फुले लिहितात.

"विद्ये विना मती गेली,
मती विना नीती गेली,
नीती विना गती गेली,
गती विना वित्त गेले,
वित्त विना शूद्र खचे,
एवढे अनर्थ एका अविद्येने केले."

या अविद्येने ब्राम्हणांचे सांस्कृतिक वर्चस्व तयार झाले. खोटा धर्म केला. त्याबाबत फुले लिहितात.

कल्पनेचे देव कोरिले उदंड ।
रचिले पाखंड हितासाठी।।

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

किन्नर गंधर्व ग्रंथी नाचविले।
अन्न फसविले कृत्रिमाने।।

अशा प्रकारे फुले यांना धार्मिक श्रध्देचे मार्मिक विवेचना आहे.

**सावकारांनी केलेले शोषण :**

फुले यांच्या मते शेतकऱ्यांचे शोषण करण्यास सावकार आघाडीवर आहेत. कारण इंग्रजांच्या राजवटीत सावकारांच्या पाठीमागे त्यांची न्यायालये आणि राजसत्ता उभी राहिली. हे सावकार मुख्यत: ब्राम्हण, मारवाडी आणि गुजर या जातीतील होते. इंग्राजांच्या राजवटीत शेतसारा देण्यासाठी आणि इतर खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावेच लागत होते. त्यामुळे शेतकरी वर्ग कर्जबाजारी झाला होता. इंग्रजी राजवटीत नव्या कायदेकानुनमुळे दलाल, कमिशन एजंट आणि व्यापारी तयार झाले. शेतसाऱ्याचा भरणा, बी-बियाण्यासाठी लागणारे भांडवल, लग्नासाठी लागणारा खर्च, धार्मिक विधीसाठी लागणारा खर्च, बैल-बारदाना यांची खरेदी इत्यादी बाबींसाठी शेतकऱ्यास आर्थिक कमतरता पडली की, सावकाराकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घेत असत. शेतकऱ्यांच्या अज्ञान आणि देवभोळेपणाचा फायदा घेवू सावकार शेत जमिनीवरचा माल व्याजापोटी हडप करीत होते. आडणीपणाचा फायदा घेवून दामदुपटीने व्याज गहाणावर केलेल्या जमिनीवर ते आपला ताबा बसवीत. फुले यांच्या लिखानातून शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा व सावकारांकडून होणाऱ्या आर्थिक शोषणाविरुध्द मार्मिक विवेचन केले आहे.

**नोकरशाही पिळवणूक :**

सावकारांच्या आर्थिक शोषणातून शेतकऱ्यांचे जीवन हराम करून टाकले. त्याचप्रमाणे सावकऱ्यांशी हातमिळवणी करून नोकरशाही सर्व अंगाने शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करीत होते. म्हणून फुले लेखणीच्या माध्यमातून सांगतात.

मोठमोठे दुकानदार । सारे भव्य अंमलदार ।।
गरीब शूद्रांवर कहर । हे पहा करती जोजारे।।
असे आंधळे सरकार।।

त्या काळात भारतात दोन प्रकारची नोकरशाही होती. एक युरोपीय नोकरशाही आणि दुसरी एतद्देशीय नोकरशाही. त्यांच्या मते इंग्रज अधिकारी लठ्ठ पगार घेवून ऐषआरामात राहतात. आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भट कामगारांचे फावते. ते शूद्रांच्या अज्ञानाचा आणि अडाणीपणाचा फायदा घेवून त्यांना लुबाडतात. लाच खातात. आपल्या जातीचा फायदा घेवू शेतकऱ्यांची आर्थिक लूट करीत होते.

**साम्राज्यशाहीची पिळवणूक :**

फुले यांचे असे मत होते की, ब्राम्हणांच्या गुलामगिरीतून शेतकऱ्यांना सोडविणारे इंग्रज सरकार तसे शेतकऱ्यांचे तारणहार आहे. भारतातील राणीची सत्ता जागृत नाही. म्हणून शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ब्रिटिश सरकार आंधळे आहे. असे फुलेंचे मत आहे. पण इंग्रज सरकारकडून खरी आशा आहे कारण इंग्रजांनी जगभर स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. ब्रिटिश सरकारचे गोरे नोकर लठ्ठ पगार घेतात. त्यांचे जीवन ऐषआरामी आहे कलेक्टर, जज हे व त्यांच्या हाताखालचा वर्ग खोटेनाटे लिहून देणाऱ्या ब्राम्हण अधिकाऱ्यांच्या हातातील बाहुले आहेत. त्यांची वागणूक शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणे हेच आहे.

**फुलेंनी शेतकऱ्यांसंबधी सुचविलेले उपाय / सुधारणा :**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण बाजूनी होणाऱ्या शोषाणासंबंधी 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकातील पाचव्या प्रकरणात परखडपणे विचार मांडले आहेत. या शोषणातून, गुलामीतून शेतकऱ्यांची सुटका केवळ विद्येमुळेच होऊ शकते हे ही त्यांन प्रभावीपणे मांडले आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी शेतकरी वर्गामध्ये सुधारणा होण्यासंबंधी मार्मिक विचार मांडले आहेत. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारवयाची असेल तर शेतीमध्ये सुधारणा केली पाहिजे असे सांगतात.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

- शेतीला योग्य तो पाणी पुरवठा झाला पाहिजे.
- शेतकी शाळा स्थापन कराव्यात.
- पिकांचे रक्षण केले पाहिजे.
- शेतीशी संबंधीत यंत्रांचा वापर करण्यास शिकविले पाहिजे.
- गोधनाचे रक्षण करुन संवर्धन केले पाहिजे. गोवंश हत्यासंबंधी कडक कायदा केला पाहिजे.
- शेतकऱ्यांसाठी उत्तम डॉक्टर ठेवले पाहिजेत.
- डोंगर-टेकड्यांवरील गवत, पालापाचोळा, मेलेले किटक व श्वापद यांच्या हाडामासांचे सत्व, पाना फुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजाग तालीवजा, साखळी, बंधारे बांधावेत. त्यामुळे पावसाचे पाणी एकंदरीत शेतात मुरूम नदी-नाल्यास मिळेल. शेती सुपीक होईल.
- तळे, तलाव आणि नदी यातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणेच शेतकऱ्यांस फुकट नेऊ द्यावा.
- उत्तम शेळ्या मेंढ्यांची पैदास वाढविण्यासाठी परदेशातून त्यांची बेणी आणावी.
- शेतकऱ्यांच्या पिकांचा जंगली जनावरापासून बचाव करण्यासाठी गावठी तोट्याच्या बंदुका शेतकऱ्यास द्याव्यात.
- शेतकऱ्यांची पिके जर जंगली जनावरांनी खाल्ली व त्यांची नासाडी केली तर सरकारने त्यांची भरपाई करुन द्यावी.
- साल दरसाल श्रावण मासी प्रदर्शने करुन, अश्विनी मासी शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेवून शेतकऱ्यांस बक्षिसे द्यावी. त्यांना पदव्या द्याव्यात.
- शेतकऱ्यांच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे शिक्षण द्यावे. त्यांना विलायतेतील शेती शाळा पाहण्यास पाठवावे. तेथील सुधारणा पाहून आपल्याकडे सुधारणा करु शकतील.
- शेतकऱ्यांच्या मुलांना पुस्तक, पाट्या, पेन, पेन्सिल, वह्या आणि शिक्षणासंबंधी लागणारे साहित्य यांचा पुरवठा करावा.
- शेतकऱ्यांस शेती सुधारण्यासाठी शेतीसंबंधीचे सर्व ज्ञान देवून शेतीसंबंधी व इतर ग्रंथालयांची व्यवस्था करण्यात यावी.

अशा प्रकारे महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' आणि 'ब्राम्हणांचे कसब' आणि इतर ग्रंथातून शेतकऱ्यांचे शोषण, सावकार, नोकरदार व इतर घटक कशा प्रकारे त्यांची सर्वांगाने लूट आणि शोषण करतात. यासंबंधी प्रखरपणे आणि मार्मिकपणे लिखाण आपल्या ग्रंथातून केले आहे. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारवयाची असेल तर शेती संबंधी शेतकी शाळा, बाजारपेठ, पिकांचे नुकसान, शिक्षण, बंधारे, जनावरे व शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मोफत द्यावे अशा अनेक सुधारणा / उपाय योजना फुले यांनी आपल्या लिखानातून मार्मिकपणे मांडल्या आहेत.

### संदर्भ :


१) शेतकऱ्यांचा आसूड, संपादन व प्रस्तावन, डॉ. नागनाथ कोतापल्ले, मेहता पब्लिशिंग हाऊस.

२) महात्मा फुले आणि आणि शेतकरी चळवळ, डॉ. अशोक चौसाळकर, लोकवाङमय गृह.

३) शेतकऱ्यांचा आसूड, डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

४) युगप्रवर्तक महात्मा जोतीबा फुले, सु. बा. भोसले, अमोल प्रकाशन, पुणे

५) राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांची भाषणे व सामाजिक क्रांतीचे आंदोलन, छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर रिसर्च अँण्ड पब्लिकेशन सेंटर, धुळे.


□◆□

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki



Scanned with OKEN Scanner